**प्रकल्प प्रवर्तक मे. स्मृती ऑरगॅनिक्स लिमिटेड, प्लॉट क्रमांक ए-२७, चिंचोली एम.आय.डी.सी. आणि गाव चिंचोली गट क्रमांक २३०, २३१, २३२ आणि २३३, तालुका: मोहोळ, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र येथील सध्या कार्यरत बल्क ड्रग्ज अँड इंटरमिडिएट्स मॅन्युफॅक्चरिंग युनिटच्या विस्तारीकरण संदर्भात आयोजित केलेल्या पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृत्तांत-**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. स्मृती ऑरगॅनिक्स लिमिटेड, प्लॉट क्रमांक ए-२७, चिंचोली एम.आय.डी.सी. आणि गाव चिंचोली गट क्रमांक २३०, २३१, २३२ आणि २३३, तालुका: मोहोळ, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र यांच्या कार्यरत बल्क ड्रग्ज अँड इंटरमिडिएट्स मॅन्युफॅक्चरिंग युनिटच्या विस्तारीकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी मंगळवार, दिनांक ०३ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता जयकुमार पाटील उद्योग भवन, प्लॉट क्र. पी-७, एम.आय.डी.सी. चिंचोली, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे आयोजित करण्यात आली होती.

श्री. निखील मोरे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री. अभिजीत पाटील, अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, सोलापूर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तसेच श्री. बाबासाहेब कुकडे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती व प्रकल्प प्रवर्तक, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, माध्यम प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करून माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरू केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ अधिसूचना व त्यानंतरच्या दिनांक १ डिसेंबर, २००९ आणि १४ ऑगस्ट, २०१८ च्या सुधारित अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण यंत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे असा आहे.

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी, समिती यांनी सांगितले की, प्रकल्प प्रवर्तक मे. स्मृती ऑरगॅनिक्स लिमिटेड, प्लॉट क्रमांक ए-२७, चिंचोली एम.आय.डी.सी. आणि गाव चिंचोली गट क्रमांक

२३०, २३१, २३२ आणि २३३, ता. मोहोळ, जि. सोलापूर, महाराष्ट्र येथे कार्यरत बल्क ड्रग्जअँड इंटरमिडिएट्स मॅन्युफॅक्चरिंग युनिटच्या विस्तारीकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठीचा प्रकल्प प्रवर्तकांचा दिनांक २०/०६/२०२५ रोजीचा अर्ज मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाला.

सदर प्रस्तावित प्रकल्प दिनांक १४.०९.२००६ पर्यावरण अधिसूचना क्र. १५३३ (ई) व त्यानंतरच्या सुधारित अधिसूचनेनुसार वर्ग 'ब' - सिंथेटिक ऑरगॅनिक केमिकल्स उद्योग - ५ (फ) अंतर्गत येतो. यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून पूर्व पर्यावरण विषयक मंजुरी घेणे आवश्यक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे. तथापि, पर्यावरण अधिसूचनेमधील जनरल कंडीशन्स विचारात घेता, माळढोक पक्षी (ग्रेट इंडियन बस्टर्ड) अभयारण्य हे प्रकल्प स्थळापासून सुमारे २.१ कि.मी. अंतरावर असलेले तसेच त्याचा ई.एस.झेड. हा प्रकल्प स्थळापासून सुमारे १.९८ कि.मी. अंतरावर आहे. तसेच प्रकल्पाचा काही भाग लगतच्या बिगर एम.आय.डी.सी जमिनीवर स्थापित असल्याने प्रस्तावित प्रकल्पाची वर्ग 'अ' पर्यावरणविषयक मंजुरी केंद्र शासनाकडून घेणे बंधनकारक आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, भारत सरकार, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToRs) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण आघात मूल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक १५/०४/२०२५ रोजी सादर केला व त्या अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजुरी दिनांक २२/०४/२०२५ रोजी प्रदान केली. त्यानुसार, प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या निर्देशानुसार क्यूसीआय-नाबेट मानांकन प्राप्त असलेल्या पर्यावरण सल्लागार संस्थेस नियुक्त करून त्याद्वारे प्रकल्पाभोवतालच्या १० कि.मी. त्रिज्येमधील पर्यावरणविषयक अभ्यास क्षेत्रामधील विविध बाबींचे तपशीलवार सर्वेक्षण केले. प्रकल्पाच्या विस्तारीकरणामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघातांचा अभ्यास करण्यासाठी प्रकल्पाच्या जागेचा आणि पर्यावरण आघात मूल्यांकन अहवालाचा एक मसुदा तयार करण्यात आला आणि तो महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीसाठी सादर करण्यात आला.

सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र दिनांक ०९.०९.२०२५ नुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांना पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्याविषयी प्रक्रिया राबविण्याची सूचना केली.

उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियत्रण मंडळ, सोलापूर यांनी मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांना सदर प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीचे अध्यक्ष या नात्याने सदरिल जनसुनावणी आयोजित करण्यासाठी तारीख व वेळ देण्याविषयी विनंती केली. मा.जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी प्रत्यक्ष पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास मंगळवार, दिनांक ०३ फेब्रुवारी २०२६ रोजी

दुपारी १२.०० वाजता मान्यता दिल्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश क्र. ई-०२/ २०२६, व्दारा पत्र क्रं. बीओ / जेडी (डब्लुपीसी)/पीएच/बी–२६०१०८-एफटीएस-००२५, दिनांक ०८/०१/२०२६ अन्वये भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना एस.ओ. क्र. १५३३, दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना एस. ओ. ३०६७ (इ), दिनांक ०१-१२-२००९ अनुसार खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | |
|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, सोलापूर, किंवा त्यांचे प्रतिनिधी (अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) | - अध्यक्ष |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे जिल्हा पुणे, | - सदस्य |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर | - आयोजक |

सदर अधिसुचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक संचार यात मराठीत व दैनिक वृत्तपत्र दिव्य मराठी यात इंग्रजीत दिनांक ३ जानेवारी, २०२६ रोजी जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती त्याचप्रमाणे सदर प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तऐवज लोकांच्या अवलोकानार्थ व माहितीसाठी खालील अधिसूचित (notified) कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते -

१) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर;

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर;

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर;

४) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जोग सेंटर, दुसरा व तिसरा मजला, वाकडेवाडी, जुना पुणे-मुंबई रस्ता, पुणे - ४११ ००३;

५) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), कल्पतरू पॉईंट, ३ रा व ४ था मजला, सायन-माटुंगा स्कीम रोड क्र. ८, सायन सर्कन समोर, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२.

६) पर्यावरण विभाग, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मंत्रालय, मादाम कामा रोड, मुंबई

७) उप प्रादेशिक अधिकारी, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, बी/४, बाळी बिल्डिंग, सिव्हिल लाईन्स, शासकीय दूध डेअरी समोर, सात रस्ता, सोलापूर - ४१३ ००३;

८) तहसीलदार, तहसील कार्यालय - मोहोळ, तालुका - मोहोळ, जिल्हा - सोलापूर;

९) गट विकास अधिकारी, पंचायत समिती - मोहोळ, जिल्हा - सोलापूर;

१०) तहसीलदार, तहसील कार्यालय - उत्तर सोलापूर, तालुका - उत्तर सोलापूर, जिल्हा - सोलापूर;

११) गट विकास अधिकारी, पंचायत समिती - उत्तर सोलापूर, जिल्हा - सोलापूर;

१२) ग्रामपंचायत कार्यालय - मौजे नान्नज, अकोलेकाटी, पाकणी, दरफळ बीबी, कोंडी, कारंबा, गुळवंची, खेड, मोहितेवाडी, शिवणी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर;

१३) ग्रामपंचायत कार्यालये - मौजे विरवडे बु., चिंचोळीकाटी, सावळेश्वर, शिरापूर, लांबोटी, ता. मोहोळ,जि.सोलापूर.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना इ. असल्यास अशा बाबींसाठी जनसुनावणीमार्फत संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात अशी माहिती, सूचना इत्यादी देऊ शकतात असे सांगितले. आयोजक यांनी प्रतिपादन केले की, ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, आक्षेप नोंदविण्यासाठी असून त्याबाबतच्या सूचना नाकारणे किंवा त्यांची शिफारस करणे अथवा प्रकल्पास संमती देणे असे अधिकार या समितीस नाहीत. स्थानिकांनी जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप यांची इतिवृत्तात नोंद घेण्यात येईल. सदर इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे सदर बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डिंग, जशीच्या तशी चित्रित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप, बैठकीचे इतिवृत्त हा सर्व दस्तऐवज पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडून सादर करण्यात येईल. त्यावर येथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरू करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प व प्रकल्पाच्या पर्यावरणीय आघात मूल्यांकन अहवाल (ईआयए) याबाबत सविस्तर सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की, बल्क ड्रग्ज हे दैनंदिन जीवनातील विविध क्रियाकलाप टिकवून ठेवण्यासाठी तसेच रोगांचे प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी अत्यावश्यक घटक बनले आहेत. भारतातील बल्क ड्रग

उत्पादन क्षेत्र सुस्थापित असून भारतीय औद्योगिक क्षेत्रात सातत्यपूर्ण वाढ नोंदवित आहे. भारतात व परदेशात बल्क ड्रग्ज व इंटरमीडीएट्सची वाढती मागणी तसेच उत्पादन व विक्रीसंबंधित सततच्या बदलत्या व स्पर्धेच्या बाजारपेठीय परिस्थितीमुळे प्रवर्तकांनी विद्यमान बल्क ड्रग्ज व इंटरमीडीएट्स उत्पादन प्रकल्पाच्या विस्तारीकरणाचा निर्णय घेतला आहे.

विस्तारीकरण प्रकल्पासाठी एकूण गुंतवणूक ₹ २५ कोटी आहे. तसेच या विस्तारीकरणासाठी सुमारे १०२ अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता असून त्यासाठी स्थानिकांना प्राधान्य दिले जाणार आहे. उद्योगामध्ये उत्तम व्यवस्थापन पद्धतींचे पालन केले जाते. सर्व अंतर्गत रस्ते पूर्णपणे पक्के व आर.सी.सी बांधकामाचे आहेत.

विस्तारीकरणानंतर प्रकल्प क्षेत्रामध्ये कोणतीही वाढ होणार नसून सध्याच्या प्रकल्प क्षेत्रामध्येच विस्तारीकरण करण्यात येईल. विस्तारीकरणानंतर १९ नवीन उत्पादने घेण्यात येतील. त्याचवेळी सध्याची १० उत्पादने पूर्णपणे थांबवण्यात येतील. तसेच ५ उत्पादनांची निर्मिती कमी व ६ उत्पादनांची निर्मितीत वाढ करण्यात येईल. त्यामुळे विस्तारीकरणानंतर एकूण उत्पादन क्षमता (४९२.५ मे.टन/महिना) ही सध्याच्या उत्पादन क्षमते इतकीच राहील. विस्तारीकरणानंतर एकूण ३०२ घन मी. प्रती दिन इतके पाणी वापरले जाईल. तसेच १२३.५ घन मी. प्रती दिन इतके सांडपाणी निर्मिती होईल.

विद्यमान प्रकल्पात सांडपाणी प्रक्रिया संयंत्र (ईटीपी) उपलब्ध आहे. सांडपाणी उच्च सी.ओ.डी. व टी.डी.एस. आणि कमी सी.ओ.डी. व टी.डी.एस. अशा दोन प्रवाहांमध्ये वेगळे केले जाते. सध्या प्रक्रिया केलेले सांडपाणी पूर्णतः उद्योगात पुनर्वापरित केले जाते व हीच पद्धत विस्तारीकरणानंतर चालू राहील. त्यामुळे ताज्या पाण्याच्या वापरामध्ये ४५% इतकी घट होईल. हा प्रकल्प शून्य द्रव उत्सर्जन (झेड.एल.डी) प्रकारचा असून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर सोडला जाणार नाही.

सध्याच्या प्रकल्पात ३ व ४ टी.पी.एच. बॉयलर असून त्यासाठी सायक्लोन डस्ट कलेक्टर तसेच बॅग फिल्टर हे वायू प्रदूषण नियंत्रण उपकरण लावले आहे. सदरील बॉयलरसाठी कोळसा हे इंधन म्हणून वापरले जाते. प्रस्तावित प्रकल्पामध्ये नियोजित १२ टी.पी.एच. बॉयलरसाठी मल्टीसायक्लोन डस्ट कलेक्टर तसेच बॅग फिल्टर हे वायू प्रदूषण नियंत्रण उपकरण म्हणून बसविण्यात येतील. या बॉयलरसाठी कोळसा व बगॅस हे इंधन म्हणून वापरले जाईल. निर्माण होणारा घनकचरा म्हणजे बॉयलर राख विटा उत्पादकांना दिली जाईल. हीच पद्धत सध्याच्या प्रकल्पामध्ये हि चालू आहे. निर्माण होणारा घातक कचरा सी.एच.डब्ल्यू.टी.एस.डी.एफ., रांजणगाव येथे पाठविण्यात येतो व विस्तारीकरणानंतर हि पाठविण्यात येईल.

प्रस्तावित प्रकल्पात पर्यावरण संरक्षणासाठी रु. ३४० लाखांची तर विविध प्रदूषण नियंत्रण यंत्रणांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी दरवर्षी रु. ८५ लाखांची तरतूद करण्यात आली आहे. सामाजिक व

पर्यावरणीय जबाबदारी (सी.ई.आर.) अंतर्गत ₹ २५ लाख (भांडवली गुंतवणूक रु. २५ कोटींच्या १%) इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानुसार एकूण प्रकल्प क्षेत्रापैकी ३३% क्षेत्र हरित पट्टा म्हणून विकसित करणे आवश्यक असते. तथापि, प्रकल्प प्रवर्तकांकडून आतापर्यंत ३८% क्षेत्र हरित पट्टा म्हणून विकसित व निर्देशित केले आहे.

प्रकल्प भोवतालच्या १० कि.मी. त्रिज्येच्या अभ्यास क्षेत्रामधील विविध पर्यावरणीय विषयक घटकांचा करण्यात आलेल्या सखोल अभ्यास मॉनिटरिंग व डेटा विषयक तपशील देऊन सविस्तर सादर करण्यात आला. त्यामध्ये हवेचा दर्जा, भूपृष्ठीय व भूगर्भीय पाणी, माती परीक्षण, आवाजाची तीव्रता, परिसराची सामाजिक व आर्थिक स्थिती व अभ्यास क्षेत्रातील पारिस्थिती व जैवविविधता इ. बाबी विषयी तपशीलवार माहिती सादर करण्यात आली. त्यापुढे जाऊन वरील सर्व पर्यावरणाच्या घटकांवर प्रस्तावित प्रकल्पामुळे काय परिणाम होईल याबाबत सादरीकरण करताना पर्यावरण आघात मुल्यांकन अभ्यासाचे महत्व व पद्धती या गोष्टीबाबत माहिती दिली गेली. अशा प्रकारे अंतिमतः स्मृती ऑर्गेनिक्स लि. यांचा सध्याचा प्रकल्प व त्यांचे नियोजित विस्तारीकरण हे स्थानिक परिसर, महाराष्ट्र राज्य व देशाच्या हिताचे असल्याचे सांगण्यात आले.

सादरीकरण पुर्ण झाल्यानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की, मा. अध्यक्ष यांच्या संमतीने उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप नोंदविण्याची परवानगी देण्यात येत आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले. सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले नांव, गावाचे नांव सांगण्यात यावे असेही सूचित करण्यात आले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

**१) श्री. अभिजीत पाटील, अतिरिक्त जिल्हाधिकारी, सोलापूर व अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती:- विद्यमान उद्योगामध्ये कोणतीही जीवितहानी झाली आहे का?**

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की, एपीआय उत्पादन क्षेत्रातील आमच्या ३० वर्षांच्या यशस्वी अनुभवाचा आम्हाला अभिमान आहे. विद्यमान प्रकल्पाच्या औद्योगिक परिसरात आजपर्यंत कोणतीही प्राणघातक घटना किंवा जीवितहानी झालेली नाही. तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी याची पुष्टी केली व त्यासंबंधीच्या स्पष्टीकरणाद्वारे अधिक माहिती सादर केली.

२) श्री. किसन धोत्रे, चिंचोळीकरटी, ता. मोहोळ, जि. सोलापूर :-

माझी शेत जमीन संबंधित कंपनीच्या शेजारी आहे आणि मागील २५ वर्षांपासून मी सतत याविरोधात तक्रारी करत आहे. मी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे वारंवार लेखी तक्रारी सादर केल्या आहेत. गावामध्ये सांडपाणी सोडणे व ते जमिनीत मुरू देणे इत्यादी कारणांमुळे मंडळाने कंपनीला बंदी नोटीस देखील दिली होती. यामुळे आमच्या शेत जमिनीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. गावात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई आहे. जिथे जिथे बोअरवेल घेतल्या जातात, तिथे रासायनिक दूषित पाणी आढळते. आमच्या शेतात पिके व्यवस्थित येत नाहीत. अशा परिस्थितीत या कंपनीला पुन्हा परवानगी कशी देता येईल? कंपनीने सादर केलेल्या माहितीत सुमारे ५०% माहिती चुकीची आहे. कंपनी मोठ्या प्रमाणात लाकूड जाळते, जे पर्यावरणासाठी हानिकारक आहे. काही काळ त्यांनी लाकूड जाळणे बंद करून कोळसा वापरायला सुरुवात केली; परंतु तदनंतर त्यांनी कोळसा वापरणे बंद करून पुन्हा लाकूड जाळणे सुरू केले. हजारो टन लाकूड इंधन म्हणून जाळले जात आहे.

सध्या कंपनी परिसराच्या बाहेर सांडपाणी सोडत आहे. या प्रदूषणामुळे आमच्या गावातील सुमारे ७-८ व्यक्तींना कर्करोगासारखे गंभीर आजार झाले आहेत. त्यामुळे कंपनीविरुद्ध कठोर कारवाई करावी. यापूर्वी देखील कंपनीविरुद्ध अर्ज दाखल करण्यात आला होता. सध्या जाहिर सुनावणीस उपस्थित असलेल्यांपैकी सुमारे ८०% लोक कंपनी मधील आहेत. प्रत्यक्ष प्रभावित गावकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित नाहीत.

यानंतर मा. अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सर्व हरकती लेखी स्वरूपात सादर कराव्यात; त्यानुसार कारवाई करण्यात येईल.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीची सूचना ३० दिवस आधी वर्तमानपत्रांमध्ये व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यातील माहितीच्या आधारे कोणताही नागरिक व व्यक्ती जनसुनावणीस उपस्थित राहू शकतात व आपल्या हरकती नोंदवू शकतात. त्यामुळे कंपनी अथवा एम.आय.डी.सी. मधील कोणतेही कर्मचारी जनसुनावणी साठी उपस्थित राहू शकतात. उपस्थित असलेले काही लोक कंपनीचे कर्मचारी असले तरी ते स्थानिक नागरिकच आहेत.

त्यानंतर श्री. धोत्रे यांनी अध्यक्ष जनसुनावणी समिती यांच्यासोबत बराचवेळ मोठ्या आवाजात आरडाओरडा करत वाद घातला. त्यामुळे जनसुनावणी स्थळावर गोंधळाचे व दहशतीचे वातावरण होत आहे असे पाहून मा. अतिरिक्त जिल्हाधिकारी, सोलापूर (अध्यक्ष जनसुनावणी समिती) यांनी श्री. धोत्रे यांना आवाज कमी करण्याबाबत सूचना केली व धमकीचे आणि दहशतीचे शब्द न वापरण्याबाबत सांगितले. तदनंतर मा. अध्यक्ष यांनी सांगितले कि तुमचे म्हणणे ऐकून घेण्यात आले आहे आणि तुमच्या

सर्व तक्रारी लेखी स्वरूपात देण्यात याव्यात. तरीही पुढे धोत्रे यांनी वाद वाढवून आमचे म्हणणे कोणीही ऐकून घेत नसल्याचे सांगून आमचा आवाज दाबण्याचा प्रयत्न होत आहे असे सांगितले. या सगळ्या प्रकरणानंतर मा. अध्यक्ष व सदस्य, जनसुनावणी समिती यांनी धोत्रे यांना समज देत खाली बसण्याचे व बाकीच्यांना बोलण्याची संधी देण्याचे सांगितले.

त्यानंतर श्री. विक्रम धोत्रे यांनी सांगितले कि, २००० सालापासून आम्ही या कंपनी विरोधात तक्रारी करत आहोत. तसेच या कंपनीने गेले २० ते २५ वर्षे चिंचोलीकाटी ते पाकणी हा गावजोड रस्ता अतिक्रमण करून व भिंत घालून अडवला आहे.

या प्रश्नाची दखल घेताना मा. अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी प्रकल्प प्रवर्तकांना जाब विचारला असता असे कोणतेही अतिक्रमण करून गाव जोड रस्ता अडवला नसल्याचे प्रकल्प प्रवर्तकांनी स्पष्ट केले. तसेच मा. अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी लेखी तक्रारी पत्र स्वीकारून एस.एल.आर. कडून पाहणीचे आदेश देण्यात येतील असे सांगितले. तथापि या सर्व घडामोडींनंतरही श्री. किसन धोत्रे यांनी वाद वाढवल्याने व त्यामुळे जनसुनावणी हॉल मधील शांतता व वातावरण बिघडेल असे कृत्य केल्याने मा. अध्यक्ष जनसुनावणी समिती (अतिरिक्त जिल्हाधिकारी, सोलापूर) यांनी पोलीस संरक्षण बोलावण्याचे आदेश दिले व श्री. किसन धोत्रे यांना जनसुनावणी हॉल बाहेर जाण्यास सांगितले.

**३) श्री. बाबासाहेब कुकडे, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती : -**

SOL यांच्या विद्यमान युनिट शेजारील बिगर एम.आय.डी.सी जागेमध्ये प्रकल्पासाठी नवीन उत्पादन प्लांट उभारला जाणार आहे की विद्यमान युनिटमध्येच विस्तार होणार आहे?

पर्यावरण सल्लागारांनी उत्तर दिले की, बिगर एम.आय.डी.सी जागेमध्ये कोणताही नवीन उत्पादन प्लांट उभारण्यात येणार नाही. तेथे सांडपाणी प्रक्रिया संयंत्र (ई.टी.पी) अस्तित्वात आहे आणि सदरील जागेवर अतिरिक्त हरित पट्टा विकसित करण्यात येणार आहे.

**४) श्री. व्ही. सुनंदा रेड्डी, पर्यावरणतज्ज्ञ, तेलंगणा :**

त्यांनी प्रथम सांगितले की, औद्योगिक विकास व शाश्वत विकासाला पाठिंबा देणारे ते पहिले पर्यावरणतज्ज्ञ आहेत. एमआयडीसी क्षेत्रात उद्योग स्थापन केल्याबद्दल त्यांनी प्रकल्प व्यवस्थापनाचे अभिनंदन केले व समर्थन व्यक्त केले. उद्योग परिसरात फळझाडे लावण्याची विनंती त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना केली. पर्यावरण संरक्षणासाठी पावसाचे पाणी साठवण्याचा सल्ला दिला. तसेच जवळील गावांमध्ये कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्याचा सल्ला दिला. प्रस्तावित सीएसआर उपक्रमांसाठी गावातील स्वयंसेवकांच्या मदतीने समन्वय समिती स्थापन करण्याची सूचना त्यांनी केली. तसेच त्यांनी या उद्योगास पर्यावरण मंजुरी देण्याबाबत पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयास बिनशर्त मंजुरी देण्याबाबत आवाहन केले.

**५) श्री. एस. चंद्रशेखर, पर्यावरणतज्ज्ञ, तेलंगणा :**

त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना कारखाना परिसराभोवती हिरवळ विकसित करण्याची विनंती केली. तसेच जवळील गावांमध्ये सीएसआर उपक्रम राबविण्याची सूचना केली. उद्योगामध्ये ५०% स्थानिकांना रोजगार देण्याची मागणी केली. उद्योग परिसरात फळझाडे लावण्याचा सल्ला दिला. तसेच या उद्योगास पर्यावरण मंजुरी देण्याबाबत त्यांनी पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयास आवाहन केले.

**श्री. बाबासाहेब कुकडे, सदस्य, पर्यावरण जाहीर जनसुनावणी समिती यांची सुचना :-**

ईटीपी, एपीसी यांसारख्या प्रदूषण नियंत्रण यंत्रणांची कार्यक्षमता व पर्याप्तता ही नामांकित अधिकृत संस्था किंवा संघटनेमार्फत तपासण्यात यावी. तसेच प्रदूषण भाराचे मूल्यमापन देखील करण्यात यावे.

**सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी नमूद केले की, स्थानिक नागरिकांनी अतिशय योग्य पद्धतीने प्रश्न व सूचना मांडल्या असून प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी त्यांची समर्पक उत्तरे दिली आहेत. त्यामुळे मा. अध्यक्षांनी पुढील कार्यवाही करावी, अशी विनंती करण्यात आली.

बैठकीचा समारोप करताना मा. अध्यक्ष, पर्यावरण जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आज आपण प्रकल्प प्रवर्तक मे. स्मृती ऑरगॅनिक्स लिमिटेड (सोलापूर) यांच्या प्लॉट क्र. ए-२७, चिंचोळी एमआयडीसी तसेच गट क्र. २३०, २३१, २३२ व २३३, गाव चिंचोली, ता. मोहोळ, जि. सोलापूर, महाराष्ट्र येथे प्रस्तावित बल्क ड्रग व इंटरमीडिएट्स उत्पादन युनिटच्या विस्तारीकरणासाठी पर्यावरण जाहिर जनसुनावणीसाठी एकत्र आलो आहोत. प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागारांनी प्रस्तावित प्रकल्प व त्याच्या पर्यावरणीय आघात मूल्यांकन (ई.आय.ए) अहवालाबाबत सविस्तर माहिती दिली तसेच उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे दिली.

तसेच प्रकल्प प्रवर्तक व त्यांचे पर्यावरण सल्लागार यांनी उपस्थितांनी विचारलेल्या शंकांचे निरसन करणे अपेक्षित असून ते बैठकीच्या इतिवृत्तात नोंदविण्यात यावे.

अध्यक्ष, पर्यावरण जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की, प्रस्तावित प्रकल्पाबाबत कोणत्याही सूचना अथवा हरकती असल्यास त्या आजच लेखी स्वरूपात सादर कराव्यात. येथे कोणताही निर्णय घेतला जात नाही, परंतु नागरिकांच्या सूचना व हरकती शासनाकडे सादर केल्या जातात.

अध्यक्षांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत सूचना व हरकती नोंदविण्याचे आवाहन केले. यावर सभागृहाकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.

अध्यक्षांनी सर्वांचे उपस्थितीबद्दल आभार मानून बैठक समाप्त झाल्याची घोषणा केली.

अध्यक्षांचे आभार मानून बैठक समाप्त करण्यात आली.

जाहिर जनसुनावणी संदर्भात प्राप्त लेखी प्राप्त लेखी सुचना/हरकती/टिप्पणी/तक्रारींची प्रत व प्रकल्प प्रवर्तक मे. स्मृती ऑरगॅनिक्स लिमिटेड यांनी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिलेल्या उत्तराची प्रत सोबत जोडले आहे.

| | |
|---|---|
| (निखील जा. मोरे) | (बाबासाहेब म. कुकडे) |
| आयोजक, | सदस्य, |
| पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती | पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती |
| तथा | तथा |
| उप प्रादेशिक अधिकारी, | प्रादेशिक अधिकारी, |
| महाराष्ट्र प्रदूषण | महाराष्ट्र प्रदूषण |
| नियंत्रण मंडळ, सोलापूर | नियंत्रण मंडळ, पुणे |

(अभिजित म. पाटील)

अध्यक्ष

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती

तथा

अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर

जिल्हा - सोलापूर

तहसील उपजिल्हाधिकारी कार्यालय
नस्ती क्रमांक– ५२७
नस्ती प्राप्त दि. ०८/०४/२०२६
नस्ती निर्गत दि. १३/४/२०२६
शेरा ........................................